"सहकारी संस्थांसाठी अटल
अर्थसहाय्य योजना" सन २०१९-२०
मध्ये सुरू ठेवणेबाबत.

महाराष्ट्र शासन

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

शासन निर्णय क्र. संकीर्ण-०५१९/प्र.क्र.६६/१८-स,

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १७ जून, २०१९

वाचा :- १) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र. संकीर्ण- १०१८/प्र.क्र.१२६/१८-स, दिनांक ०२/०१/२०१९.

२) शासन शुध्दिपत्रक, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र. संकीर्ण-१११८/ प्र.क्र.१२६/१८-स, दिनांक २३/०१/२०१९.

३) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र. संकीर्ण-१११८/प्र.क्र.१४३/१८-स, दिनांक २६/०२/२०१९.

प्रस्तावना :-

मंत्रीमंडळाच्या दि.१८.११.२०१८ रोजी झालेल्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार वाचा येथील क्रमांक (१) व (२) अन्वये सहकारी संस्थांच्या व्यवसाय/प्रकल्पांना अर्थसहाय्य देण्यासाठी **" सहकारी संस्थांसाठी अटल अर्थसहाय्य योजना "** या योजनेची अंमलबजावणी महाराष्ट्र सहकार विकास महामंडळामार्फत सन २०१८-१९ मध्ये सुरू होती.

सदर योजना सन २०१९-२० मध्ये सुरू ठेवण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने दिनांक ०४.०६.२०१९ रोजी झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीत निर्णय घेण्यात आला.

२. शासन निर्णय :-

अ) सन २०१८-१९ मध्ये दि. १८.११.२०१८ रोजी मा. मंत्री मंडळाने मंजूर केलेल्या सहकारी संस्थासाठी अटल अर्थसहाय्य योजनेस मा.मंत्री (वित्त), मा.मंत्री (सहकार) आणि मा. मुख्य सचिव यांची त्रिसदस्यीय समिती यांनी केलेल्या अंतिम सुधारणासह शासन निर्णय दिनांक ०२.०१.२०१९ व शुद्धीपत्रक दि.२३.०१.२०१९ नुसार मंजूरीस पात्र असलेल्या “सहकारी संस्थांसाठी अटल अर्थसहाय्य योजना” या योजनेची अंमलबजावणी सन २०१९-२० मध्ये पुढे सुरू ठेवण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे.

ब) सदर योजनेअंतर्गत वाचा क्र.३ अन्वये सन २०१८-१९ मध्ये महाराष्ट्र सहकार विकास महामंडळास उपलब्ध करून दिलेली रक्कम रू. ८००४.६९ लाख मंजूर केलेल्या प्रयोजनांसाठीच सन २०१९-२० मध्ये वापरण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

क) सदर योजना सन २०१८-१९ अखेर ज्या स्वरूपात अंमलात होती त्याच स्वरूपात महाराष्ट्र सहकार विकास महामंडळामार्फत राबविण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६१७१५२८१६५२०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Ramesh Shankarrao Shingte

Digitally signed by Ramesh Shankarrao Shingte
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Cooperation, Marketing And Textile Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fed1b2ed6e1e4aca719170d9eae8aa251ee28dc56c75d8a65acb34103d45bd48, serialNumber=b9bf7a534d8f1272bd902482bf95b556a5baefdddce18574a78fa2d8d0957d1f, cn=Ramesh Shankarrao Shingte
Date: 2019.06.17 15:33:01 +05'30'

(रमेश शिंगटे)
अवर सचिव तथा सहनिबंधक, सहकारी संस्था
महाराष्ट्र शासन

प्रत :-

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
२) मा. मंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
३) मा. मंत्री (वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
४) मा. राज्यमंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
५) मा. विधानसभा सदस्य व विधान परिषद सदस्य (सर्व)
६) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई ३२.
७) मा. अप्पर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
८) मा. अप्पर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
९) मा. प्रधान सचिव (पणन), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
१०) मा. सचिव (व्यय), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
११) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
१२) आयुक्त (कृषी), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३) संचालक, पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
१४) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे
१५) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ, पुणे
१६) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, (सर्व)
१७) संचालक आत्मा, (सर्व)
१८) विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, (सर्व)
१९) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)

२०) सहायक निबंधक, सहकारी संस्था (सर्व)

२१) प्रशासक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, लि. मुंबई

२२) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई

२३) सर्व कार्यासने, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई

२४) नियोजन विभाग (१४६१ कार्यासन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई

२५) वित्त विभाग (व्यय-२/ अर्थसंकल्प १३ कार्यासन), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

२६) निवड नस्ती १८-स कार्यासन.